नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७१ Issue - 171 | वार - बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६ Blow- Wednesday Date 18 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



हार्दिक अभिनंदन







सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित सोलापूर
प्रधान कार्यालय

सोलापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात दमदार एन्ट्री!

अक्कलकोट तालुक्याचे नाव सहकार क्षेत्रात जिल्हास्तरावर अभिमानाने उंचावणारे, आपल्या अष्टपैलू नेतृत्वाने व कर्तृत्वाने सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण करणारे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार

मा. आ. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी साहेब

यांची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मंगलमय शुभेच्छा!

आपल्या नेतृत्वातून सोलापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला नवी दिशा व बळ मिळो, हीच सदिच्छा!

चेअरमन



----- शुभेच्छुक -----

सम्यक बहुउद्देशीय सहकारी संस्था, गोगांव
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

कमलाकर सोनकांबळे

संपादकीय....

माहीची निवृत्ती

भारतीय क्रिकेट वर्तुळातून कुणाच्याही ध्यानी मनी नसताना चेन्नई सुपर किंग्सचा अनुभवी फलंदाज आणि चॅम्पियन कर्णधार महेंद्रसिंह धोनी याने आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. क्रिकेट चाहत्यांना २० व्या मोसमाआधी रिटेन्शन लिस्टची प्रतिक्षा असताना धोनी निवृत्त होत असल्याचं जाहीर केलंय. त्यामुळे एका पर्वाचा शेवट झाला आहे. धोनीच्या निवृत्तीनंतर सोशल मीडियावर नेटीझन्सने दिग्गज क्रिकेटपटूचे आभार मानले आहेत. धोनीने आयपीएलला रामराम केला असला तरी तो चेन्नई सुपर किंग्स टीमसोबतच कायम राहणार आहे. धोनी निवृत्तीनंतर सीएसकेसोबत दुसऱ्या इनिंगची सुरुवात करणार आहे. धोनी आता २० व्या हंगामापासून मेंटॉर म्हणून जबाबदारी पार पाडणार आहे. धोनीने त्याच्या नेतृत्वात सीएसकेला एकूण ५ वेळा आयपीएल ट्रॉफी जिंकून दिली. आता धोनी मैदानाबाहेरुन सीएसके टीमला मार्गदर्शन करणार आहे. धोनीने आयपीएल कारकीर्दीत सर्वाधिक काळ चेन्नई सुपर किंग्सचं प्रतिनिधित्व केलं. तसंच धोनी या स्पर्धेत रायझिंग पुणे सुपर जायंट्स संघाकडूनही खेळला. धोनीने या दोन्ही संघांचं नेतृत्वही केलं. धोनीने आयपीएलमध्ये एकूण २७८ सामन्यांत प्रतिनिधित्व केलं. धोनीने या दरम्यान २४८ डावांमध्ये ५ हजारांपेक्षा अधिक धावा केल्या. धोनीने ५ हजार ४३९ रन्स केल्या. धोनीने या दरम्यान २४ अर्धशतकं लगावली. तसंच धोनीचा ८४ हा हायस्कोअर राहिला. तसंच धोनीने विकेटकीपर म्हणूनही उल्लेखनीय कामगिरी केली. धोनीने स्टंपमागून एकूण अनेक फलंदाजांना आऊट केलं.

कार्तिकी यात्रेसाठी पोलीस प्रशासन सज्ज; वारकऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य : अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्रीक्षेत्र पंढरपूर येथे होणाऱ्या कार्तिकी यात्रेसाठी लाखो वारकरी व भाविक दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने व्यापक सुरक्षा नियोजन केले आहे. कार्तिकी शुद्ध एकादशी २१ नोव्हेंबर २०२६ रोजी असून, यात्रेच्या कालावधीत वारकरी, भाविक आणि स्थानिक नागरिकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासह वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. यात्रेच्या बंदोबस्तासाठी एकूण ४ हजार ६५६ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, गर्दी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियमन आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी विविध पथके कार्यरत राहणार असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी दिली.

कार्तिकी यात्रेच्या निमित्ताने राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने वारकरी पंढरपुरात दाखल होतात. चंद्रभागा नदीचे वाळवंट, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर, महाद्वार घाट, दर्शन रांगा, पत्राशेड तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. गर्दीचे योग्य व्यवस्थापन करणे, भाविकांची गैरसोय टाळणे, चोरीसारख्या घटनांना प्रतिबंध





करणे आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येत आहे.

यात्रेच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी एक पोलीस अधीक्षक, एक अप्पर पोलीस अधीक्षक, १८ पोलीस उपअधीक्षक, ४६ पोलीस निरीक्षक, २७८ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, २ हजार ५९२ पोलीस अंमलदार, १०० गामा पथकाचे जवान आणि १ हजार ६२० होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच तीन राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) कंपन्या, दोन बॉम्ब शोधक व नाशक पथके (बीडीएस), दोन शीघ्र कृती पथके (आरसीपी), एक क्विक रिस्पॉन्स टीम (क्यूआरटी) तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी नऊ प्रशिक्षित कार्ट पथके तैनात करण्यात आली आहेत. या सर्व यंत्रणांच्या समन्वयातून यात्रेच्या संपूर्ण कालावधीत सुरक्षा व्यवस्था प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

यात्रेच्या कालावधीत नदीपात्र, ६५ एकर, महाद्वार परिसर, महाद्वार घाट, पत्राशेड यांसह गर्दीच्या प्रमुख ठिकाणी वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. या माध्यमातून गर्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार असून, गर्दी वाढल्यास तातडीने आवश्यक उपाययोजना करता येणार आहेत. यात्रेत वारकरी आणि भाविकांच्या गर्दीचा फायदा घेऊन चोरी, पाकीटमारी तसेच इतर गैरप्रकार होण्याची शक्यता लक्षात घेता पोलीस प्रशासनाने विशेष उपाययोजना केली आहे. वारकरी व सामान्य नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तैनात करून 'माऊली स्कॉड' स्थापन करण्यात आले आहे. तसेच शहरातील महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी सुमारे ३३५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून देखरेख ठेवण्यात येणार आहे. यामुळे गर्दीच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे, संशयास्पद घटनांची माहिती मिळविणे आणि आवश्यकतेनुसार तातडीने पोलीस मदत पोहोचविणे शक्य होणार आहे.

■ ४ हजार ६५६ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती
■ ३३५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे गर्दीवर नजर
■ नऊ प्रशिक्षित कार्ट पथके तैनात; सात ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे

यात्रेसाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांना तातडीने पोलीस मदत मिळावी, त्यांच्या अडचणींचे निराकरण व्हावे आणि आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, यासाठी सात ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट आणि अंबाबाई पटांगण यांसह प्रमुख ठिकाणी ही मदत केंद्रे कार्यरत राहणार आहेत. भाविकांना गर्दीचे व्यवस्थापन, सुरक्षित मार्ग, वाहतूक व्यवस्था तसेच आवश्यक सूचनांची माहिती मिळावी यासाठी ध्वनिक्षेपक यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे.

कार्तिकी यात्रेच्या काळात पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणावर खासगी वाहने दाखल होतात. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये, भाविकांना मंदिर परिसरात ये-जा करताना अडथळे निर्माण होऊ नयेत आणि आपत्कालीन सेवांची वाहने विनाअडथळा मार्गस्थ व्हावीत, यासाठी विशेष वाहतूक आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार जड वाहतूक शहराबाहेरून वळविण्यात आली आहे. शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी १३ ठिकाणी डायव्हर्जन पॉईंट सुरू करण्यात आले आहेत. तसेच खासगी वाहनधारकांसाठी शहरात व शहराबाहेर मिळून १३ ठिकाणी वाहनतळांची व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्तिकी यात्रा ही महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाची यात्रा आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत यात्रा शांततेत, सुरक्षित आणि निर्विघ्नपणे पार पडावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे. वारकरी व भाविकांनी गर्दीच्या ठिकाणी सतर्क राहावे, मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, वाहतूक नियमांचे पालन करावे तसेच पोलीस प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे. असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी केले आहे.

काळभैरव व शनि मंदिराच्या जागेचा नकाशा जाहीर करा, अन्यथा आंदोलन; गणेश अंकुशराव यांचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील अत्यंत प्राचीन असलेल्या काळभैरव आणि शनि मंदिराची सध्या भयानक अवस्था झाली असून परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या दोन्ही मंदिरांची एकूण जागा किती चौरस फूट आहे आणि त्याचा जुना ऐतिहासिक नकाशा व रचना (स्ट्रक्चर) काय आहे, याचा मंदिर समितीने तातडीने खुलासा करावा; अन्यथा 'महर्षी वाल्मिकी संघा'च्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर बोलताना अंकुशराव यांनी मंदिर समितीच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, पंढरपुरातील काळभैरव आणि शनि मंदिर हे अत्यंत प्राचीन श्रद्धास्थान आहे. मात्र, सध्या या ठिकाणी प्रचंड अस्वच्छता पसरली असून मंदिराची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

शनि मंदिर आणि काळभैरव मंदिराची नेमकी जागा किती स्क्वेअर फूट आहे, या जागेचा मूळ नकाशा आणि जुना ऐतिहासिक नकाशा उपलब्ध असल्यास तो तात्काळ दाखवावा, अशी मुख्य मागणी त्यांनी केली आहे. मंदिर समितीचे अध्यक्ष, अधिकारी आणि सदस्यांनी या सर्व बाबींचा पारदर्शकपणे खुलासा करावा. जर समितीने याकडे दुर्लक्ष केले, तर मंदिराच्या संवर्धनासाठी महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने आंदोलन करावे लागेल, असेही गणेश अंकुशराव यांनी स्पष्ट केले.

कृषी व अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी व फार्मर आयडी तातडीने तयार करावा

■ मदत व पुनर्वसन विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन
■ अडचणी सोडविण्यास राज्य शासन तत्पर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे.

ग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करावी व आवश्यक पडताळणी पूर्ण करावी.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जाऊन फार्मर आयडी तयार करून घ्यावा. राज्यातील शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

शाळा, मैत्री, आठवणी आणि कृतज्ञतेचा अनोखा सोहळा; श्री. एस. एस. शेळके प्रशाला, वागदरीच्या १९९३-९४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहबंध मेळावा उत्साहात संपन्न

३२ वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेच्या अंगणात रंगला आठवणींचा सोहळा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/प्रतिनिधी : शाळा तीच... वर्ग तेच... मैदान तेच... फक्त काळ पुढे सरकला, विद्यार्थी मोठे झाले आणि आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटांवर विखुरले गेले. मात्र मनाच्या एका कोपऱ्यात जपलेल्या शाळेच्या आठवणी, मित्रमैत्रिणींची मैत्री आणि गुरुजनांविषयीचा आदर आजही तसाच कायम आहे. याच आठवणींना उजाळा देत, जुन्या स्नेहबंधांना पुन्हा घट्ट करत आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत श्री. एस. एस. शेळके प्रशाला, वागदरी येथील १९९३-९४ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेहबंध मेळावा मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

अनेक वर्षांनंतर शाळेच्या अंगणात एकत्र आलेले विद्यार्थी, एकमेकांना भेटल्यानंतर चेहऱ्यावर उमटलेला आनंद, जुन्या आठवणी सांगताना डोळ्यांत तरळलेले भाव आणि गुरुजनांचे आशीर्वाद घेताना मनात दाटून आलेली कृतज्ञता, अशा अनेक भावनिक क्षणांनी हा दिवस अविस्मरणीय ठरला. जणू काही पुन्हा एकदा शाळा भरली होती आणि बालपण काही



तासांसाठी पुन्हा जगायला मिळाले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेतील दिवंगत गुरुजन आणि दिवंगत मित्रमंडळींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिनकर जावळे सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेच्या विद्यमान मुख्याध्यापिका राजश्री शेळके मॅडम उपस्थित होत्या. यावेळी प्रधान सर, आलूरे सर, आंदोडगी सर, देशमुख सर, कांबळे सर आणि शेळके मॅडम यांनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आनंद व्यक्त करत त्यांना पुढील आयुष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात दिनकर जावळे सर यांनी समाजात संस्कारक्षम पिढी घडविण्याची गरज अधोरेखित केली. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी समाजातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदतीचा हात द्यावा, त्यांचा शैक्षणिक खर्च उचलावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच आपला एखादा मित्र संकटात असेल तर त्याच्या मदतीला धावून जाणे, मित्रत्वाचे नाते केवळ भेटीगाठींपुरते मर्यादित न ठेवता ते कृतीतून जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आई-वडिलांचे ऋण फेडणे आणि समाजाचे ऋण जाणणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

या मेळाव्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माजी विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व गुरुजनांचा केलेला सन्मान. उपस्थित विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांना फेटा, भेटवस्तू, पुस्तके आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. ज्या शिक्षकांनी आयुष्याला आकार दिला, ज्ञानाची शिदोरी दिली आणि योग्य-अयोग्याची जाणीव करून दिली, त्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा क्षण उपस्थितांसाठी विशेष भावनिक ठरला.

केवळ स्नेहमेळावा नव्हे, तर शाळेचे ऋण फेडण्याचा संकल्प!

या स्नेहमेळाव्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रशालेतील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी कायम स्वरूपी निधी उभारण्याचा घेतलेला संकल्प. जमा झालेली रक्कम मुदत ठेवीमध्ये (फिक्स्ड डिपॉझिट) ठेवून त्यातून मिळणाऱ्या व्याजाचा उपयोग शाळेतील गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी करण्यात येणार आहे. तसेच इयत्ता पाचवी ते नववीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याचाही उद्देश ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या मेळाव्याला केवळ आठवणींचे स्वरूप न राहता सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कलबुर्गी यांनी केले. यावेळी सुषमा वारे, रवी कुलकर्णी, अंबादास सोनकांबळे, भरत पाटील, शरण सुरवसे, अंबिका वळसंग, शाबुद्दीन शेख यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

या मेळाव्याचे नियोजन दोन टप्प्यांत करण्यात आले होते. प्रत्येक माजी विद्यार्थ्याची वैयक्तिक ओळख करून देण्यात आली. शाळेतील जुन्या आठवणी, परीक्षेतील कामगिरी, सध्याचा व्यवसाय, कौटुंबिक माहिती आणि आयुष्यातील वाटचाल याविषयी माहिती सांगण्यात आली. त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्याचा प्रवास ऐकण्याची आणि एकमेकांना नव्याने जाणून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रशालेच्या परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आली. सकाळी साडेनऊ वाजता सुरू झालेला हा स्नेहसोहळा सायंकाळी पाच वाजेपर्यंत रंगला. जवळपास ९० माजी विद्यार्थी या मेळाव्यास उपस्थित होते.

विशेष बाब म्हणजे दहावीच्या अ, ब, क आणि ड अशा सर्व तुकड्यांतील विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यात आला होता. शाळेत काही कारणांमुळे शिक्षण पूर्ण करू न शकलेल्या विद्यार्थ्यांनाही या स्नेहमेळाव्यात आवर्जून सहभागी करून घेण्यात आले. तसेच सातवी-आठवीनंतर पुढील शिक्षणासाठी परगावी गेलेल्या विद्यार्थ्यांनाही या स्नेहबंधात जोडण्यात आले. कोण कुठपर्यंत शिकले, कोण कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहे, यापेक्षा आपण सर्व एकाच शाळेचे विद्यार्थी आहोत, ही भावना या मेळाव्यातून प्रकर्षाने दिसून आली.

प्रत्येक विद्यार्थ्याला स्मृतिगंध सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. गुरुजनांचा सन्मान, मित्रमैत्रिणींच्या भेटी, जुन्या आठवणी, हसत-खेळत रंगलेल्या गप्पा आणि भविष्यातही एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा निर्धार अशा वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

मेळाव्याच्या यशस्वितेसाठी माजी विद्यार्थ्यांचे सामूहिक योगदान हा सोहळा यशस्वी करण्यासाठी चंद्रकांत बटगेरी, मुन्ना कलबुर्गी, शरण सुरवसे. शहाबुद्दीन शेख. गौतम बनसोडे, महांतेश कोणजी, शिवानंद नंदर्गी, गुरुनाथ सिंदगी, गणेश शिंदे, भीमाशंकर ठोंबरे, दीपक भिमपुरे, सुरेश बकरे, अप्पू सोनकांबळे, शिवाजी सनके, सलीम आमटे, भरत पाटील, परमेश्वर मगी, अंबादास सोनकांबळे, गंगणा तोळणूरे, शिवशंकर पुजारी, करुणा पाटील, रेखा लोखंडे, महानंदा नंदे, सुषमा हिबारे, प्रभावती पोमाजी, सुनंदा दुधगी, नंदा खराडे, सुरेखा गौडगाव, परशुराम वळसंग, पंचप्पा पालापुरी, सचिन सुरवसे, चंद्रहार गायकवाड, शरण लगशेट्टी, अण्णाप्पा भैरामडगी, बिबीषण क्षिरसागर यांच्यासह अनेक माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेवटी एकच भावना... शाळेचे ऋण कधीच विसरता कामा नये!

आपण आयुष्यात कितीही मोठे झालो, कितीही यश मिळवले, तरी आपल्या यशाची पहिली पायरी शाळेतच घातली गेली, हे विसरता कामा नये. शाळा आपल्याला केवळ शिक्षण देत नाही, तर जगण्याची दिशा, माणुसकीचे संस्कार आणि नात्यांची श्रीमंती देते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या शाळेतील मित्रमैत्रिणींना भेटावे, गुरुजनांचा सन्मान करावा, शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी आणि शक्य असेल ते योगदान द्यावे.

१९९३-९४ च्या या माजी विद्यार्थी मेळाव्याने केवळ जुन्या आठवणी जाग्या केल्या नाहीत, तर शिक्षण, मैत्री, सामाजिक बांधिलकी आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता यांचा सुंदर आदर्शही निर्माण केला.

खरंच... त्या दिवशी शाळा पुन्हा भरली होती; पण यावेळी हजेरी लावली होती ती अनुभवांनी समृद्ध झालेल्या विद्यार्थ्यांनी, आठवणींनी आणि आयुष्यभर जपलेल्या मैत्रीने!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

कार्तिकी यात्रा २०२६ : वारकरी-भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर समितीची जय्यत तयारी

दि. १४ नोव्हेंबरपासून २४ तास दर्शन व्यवस्था; भाविकांच्या सेवेसाठी सुमारे २ हजार मनुष्यबळ कार्यरत राहणार; दर्शन रांगेत १५ पत्रा शेडची निर्मिती, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाच्या वारकऱ्यांच्या हस्ते श्रींची शासकीय महापूजा संपन्न होणार







दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी शुद्ध एकादशी दि. २१ नोव्हेंबर रोजी असून, यात्रा कालावधी दि. १० ते २४ नोव्हेंबर असा आहे. या कालावधीत सुमारे ८ ते १० लाख भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येण्याची शक्यता आहे. यात्रेसाठी येणाऱ्या वारकरी-भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीमार्फत व्यापक नियोजन करण्यात आले आहे. मंदिरातील धार्मिक प्रथा, परंपरा, विधी तसेच दर्शन व्यवस्था व भाविकांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचे नियोजन अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

कार्तिकी शुद्ध एकादशीच्या दिवशी पहाटे २.२० वाजता महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयीसाठी दर्शनरांगेत बॅरिकेडिंग, ताडपत्री शेड, अतिरिक्त पत्राशेड, आपत्कालीन प्रवेशद्वारे, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, बसण्याची व्यवस्था, थेट दर्शन सुविधा, कुलर, पंखे व शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

परंपरेनुसार दि. १४ नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढण्यात आला असून, त्यानंतर दि. २८ नोव्हेंबरपर्यंत २४ तास दर्शन व्यवस्था सुरू राहणार आहे. शासकीय महापूजा, मंदिर समितीमार्फत होणारी श्रींची पाद्यपूजा, नित्यपूजा, विविध संस्थांचे नैवेद्य, श्री विठ्ठलाच्या पादुकांची मिरवणूक, महाद्वारकाला, प्रक्षाळपूजा आदी सर्व धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

दर्शनरांग व्यवस्थापनासाठी विशेष उपाययोजना :-

प्रतिवर्षी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन दर्शनरांग व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यात आले आहे. श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडपातील आठ गाळ्यांपैकी दोन गाळ्यांचा दर्शन व्यवस्थेसाठी वापर करण्यात येणार आहे. दर्शन मंडप ते कासार घाटापर्यंत स्कायवॉक, तसेच स्कायवॉक ते रिद्धी-सिद्धी दर्शन मंडपापर्यंत बॅरिकेडिंग व ताडपत्री शेड उभारण्यात येत आहे.

रिद्धी-सिद्धी दर्शन मंडप परिसरात कायमस्वरूपी दर्शन हॉलचे बांधकाम सुरू असल्यामुळे गोपाळपूर-स्वेरी कॉलेज रोडवरील खाजगी जागेत तात्पुरत्या स्वरूपात पत्राशेड उभारण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण १५ पत्राशेड उभारण्यात आले असून, पदस्पर्श दर्शनासाठी श्री संत ज्ञानेश्वर



दर्शन मंडप ते स्वेरी कॉलेज, गोपाळपूरपर्यंत सुमारे ३ ते ३.५ किलोमीटर लांबीची दर्शनरांग राहणार आहे. दर्शनरांगेतील व्यवस्थेची सुरक्षितता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता व विद्युत शाखेमार्फत इलेक्ट्रिकल ऑडिट करण्यात आले आहे. तसेच दर्शनरांगेत आठ ठिकाणी तात्पुरते उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत.

मुखदर्शनासाठी श्री संत तुकाराम भवन ते छत्रपती संभाजी चौकपर्यंत बॅरिकेडिंग व ताडपत्री शेड उभारण्यात आले असून, छत्रपती संभाजी चौक येथे हलता पूल बसविण्यात आला आहे.

दर्शनरांगेत पिण्याचे पाणी, आरोग्य व स्वच्छतेच्या सुविधा :-

दर्शनरांगेत भाविकांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी, चहा, खिचडी वाटप, कुलर, भक्तिगीते, लाईव्ह दर्शन, हिरकणी कक्ष, चार ते पाच विश्रांती कक्ष, आपत्कालीन नियंत्रण कक्ष (ईओसी), हरवले-सापडले विभाग, अन्नछत्र, सार्वजनिक सूचना प्रणाली, स्वच्छतागृहे, प्राथमिक आरोग्य केंद्र, अतिदक्षता विभाग, चौकशी कक्ष, सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निशमन वाहने, रुग्णवाहिका आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

देणगी व्यवस्थेसाठी अतिरिक्त स्टॉल, सोने-चांदीच्या भेटवस्तू स्वीकारण्यासाठी स्वतंत्र कक्ष, वेदांत, व्हिडिओकॉन व श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे भाविकांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांसाठी अपघात विमा योजना राबविण्यात येणार असून, स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीमही राबविण्यात येणार आहे. याशिवाय बहुभाषिक चौकशी कक्ष, दोन अद्ययावत रुग्णवाहिका, उपजिल्हा रुग्णालयामार्फत अतिदक्षता विभाग व प्रथमोपचार केंद्र तसेच बाजीराव पडसाळी येथे तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयामार्फत वैद्यकीय कक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहे.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, श्री संत तुकाराम भवन व श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भाविकांसाठी बुंदी व राजगिरा लाडू प्रसाद अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. चंद्रभागा नदीपात्रात महिला भाविकांना कपडे बदलण्यासाठी चेंजिंग रूम, दर्शनरांगेत हिरकणी कक्ष तसेच कार्तिकी एकादशीनिमित्त मंदिरात विशेष फुलांची सजावट करण्यात येणार आहे.

सुरक्षा व्यवस्थेसाठी आधुनिक यंत्रणांचा वापर :-

यात्रेदरम्यान मंदिर समितीचे कायमस्वरूपी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक असे मिळून सुमारे २ हजार मनुष्यबळ भाविकांच्या सेवेसाठी कार्यरत राहणार आहे. यात्रेदरम्यान पदस्पर्श दर्शन २२ तास १५ मिनिटे, तर मुखदर्शन २४ तास उपलब्ध राहणार आहे.

भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्ट्रक्चरल ऑडिट, इलेक्ट्रिकल ऑडिट, बॅग स्कॅनर मशीन, मॅन काउंटिंग मशीन, सुमारे २०० सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, जनरेटर, ४० वॉकी-टॉकी संच, सार्वजनिक सूचना प्रणाली व चौकशी कक्ष आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

आपत्कालीन नियंत्रण कक्ष व नदीपात्रात विशेष यंत्रणा :-

श्री संत तुकाराम भवन येथे आपत्कालीन नियंत्रण कक्ष (ईओसी) उभारण्यात आला असून, या ठिकाणी तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियंत्रण कक्षातून सीसीटीव्ही



यंत्रणा, थेट दर्शन, सार्वजनिक सूचना प्रणाली, अग्निशमन वाहन व वॉकी-टॉकी यंत्रणेच्या माध्यमातून यात्रा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

चंद्रभागा नदीपात्रात स्थानिक पोहणारे व मंदिर समितीचे कर्मचारी मिळून सुमारे १२० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. महिला भाविकांच्या सुरक्षिततेसाठी महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांसह १५ चेंजिंग रूम व ६ हिरकणी कक्ष उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

कार्तिकी यात्रा निर्विघ्न, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सदस्य आमदार राम चंद्र कदम, शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, प्रणिता भालके, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा तसेच मंदिर समितीचे सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक व संबंधित शासकीय यंत्रणा समन्वयाने परिश्रम घेत आहेत.

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर; निफाड न्यायालयातील कामकाज ठप्प; पक्षकारांसह वकिलांनाही फटका



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : समान काम, समान वेतनासह वेतनवाढीच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी सोमवार, दि. १७ नोव्हेंबर पासून बेमुदत संपावर गेले आहेत. या संपात निफाड येथील न्यायालयीन कर्मचारीही सहभागी झाल्याने जिल्हा व सत्र न्यायालयातील कामकाज ठप्प झाले आहे. त्यामुळे न्यायालयात कामानिमित्त आलेल्या पक्षकारांना आल्या पावली परतावे लागले असून वकिलांनाही या संपाचा फटका बसला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने जानेवारी २०२५ मध्येच न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव मंजूर करून राज्य सरकारकडे पाठविला होता. मात्र, सुमारे २० महिने उलटूनही राज्य सरकारकडून याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात आला आहे.

दरम्यान, निफाड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. किरण गुंजाळ यांनी संपकरी कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांना पाठिंबा व्यक्त केला. तसेच वरिष्ठ पातळीवर या संपाबाबत तातडीने निर्णय घेऊन विस्कळीत झालेले न्यायालयीन कामकाज पुन्हा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

संरक्षित सिंचन शेती क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यावर भर : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : संरक्षित सिंचन शेती क्षेत्रातील शेतकरी, हरितगृह व शेडनेट उत्पादक, उद्योजक तसेच सेवा पुरवठादारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी कृषी विभाग सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. या क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासोबतच संबंधित घटकांना भेडसावणारे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

'इंडियन ग्रीन हाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन' च्या वतीने संरक्षित शेती आणि सिंचन क्षेत्रातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली फलोत्पादन विभाग आणि कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या वतीने आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी सचिव परिमल सिंह,ऑनलाईन आयुक्त सूरज मांढरे, प्रकल्प संचालक मीनल करनवाल, 'इंडियन ग्रीन हाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन'चे मनोज मानगावे, चेतन दहीया यासह सदस्य बैठकीला उपस्थित होते.

कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून वाढीव निधी मिळविण्यासाठीही पाठपुरावा सुरू आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प तसेच कृषी समृद्धी योजना यांसारख्या विविध शासकीय योजनांमध्ये संरक्षित शेतीचा समावेश करण्याबाबत संबंधितांना अवगत करण्यात येत आहे. या माध्यमातून संरक्षित सिंचन क्षेत्रातील शेतीचा विस्तार आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येत आहे.

कृषि मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, जालना जिल्ह्यात काळ्या यादीत टाकण्यात आलेल्या ४४ सेवा पुरवठादारांना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार लेखी स्वरूपात बाजू मांडण्याची संधी देण्यात आली असून, फलोत्पादन संचालनालयामार्फत त्यांची पुन्हा सुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे.

मार्गदर्शक सूचनांनुसार संरक्षित सिंचन शेतीअंतर्गत फळे, भाजीपाला, फुले, मसाला पिके तसेच औषधी वनस्पतींचा समावेश, जुन्या हरितगृह आणि शेडनेटच्या दुरुस्तीचे प्रश्न आदी विषयांवरही यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

पश्चिमद्वार ते चौफाळा एकेरी मार्ग रहदारीस खुला ठेवणेबाबतचे आदेश जारी

दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते दि.२१ नोव्हेंबर २०२६ रोजीचे रात्रीचे ११.५९ वाजेपर्यंत एकेरी मार्ग रहदारीस खुला

वारकरी, भाविकांसाठी पश्चिमद्वार ते चौफळा एकेरी मार्ग; जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केला आदेश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिक यात्रा सोहळा शनिवार , दि. २१ नोव्हेंबर २०२६ रोजी संपन्न होत असून, यात्रा सोहळा कालावधीत दि. १० ते २४ नोव्हेंबर २०२६ असा आहे. या सोहळ्यासाठी सुमारे ०८ ते १० लाख भाविक शहरात येतात. विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे येणारा व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवित हानी होण्याची दाट शक्यता असलेने दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ०६.०० ते दि.२१ नोव्हेंबर २०२६ रोजीचे रात्रीचे ११.५९ वाजेपर्यंत पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविक यांच्याकरीता बाहेर पडण्यासाठी एकेरी रहदारीस खुला ठेवणेबाबत आदेश जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी जारी केले आहेत.

कार्तिक यात्रा सोहळ्याकरीता लाखो भाविक पंढरपूर शहर व परीसरात येतात व एकादशी सोहळ्यादिवशी चंद्रभागा स्नान करून भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतात. तेव्हा महाद्वार घाट व आजूबाजूच्या रस्त्यामध्ये लाखो भाविकांची गर्दी असते. सदरची गर्दी नियंत्रणात आणणेसाठी पोलीस प्रशासनाला मानवी साखळीचा व रस्सीचा वापर करावा लागतो. दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत असून भाविकांना पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधा कमी पडू नये यासाठी प्रशासन कार्यरत आहे. तथापि पंढरपूर शहरातील भाविकांची संख्या व सुरक्षितता लक्षात घेता यात्रा सोहळ्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाकडून गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पश्चिम द्वार ते चौफाळा हा एकेरी मार्ग झाल्यास स्टेशन रोडकडून येणारे वारकरी, भाविक हे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक भादुले चौक ते नाथ चौक तांबडा मारूती चौक- महाद्वार चौकमार्गे नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात. तसेच प्रदक्षिणामार्गे येणारे भाविक हे उत्पात गल्ली येथील रस्त्याने नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात.

प्रशासनाकडून दर्शनरांग व्यवस्थापन करून गर्दी आटोक्यात आणण्याची कार्यवाही केली जाते. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे जाणारे रस्ते अरूंद असून त्याठिकाणी येणारे व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविकांना बाहेर पडण्याचा एकेरी रहदारी मार्ग केल्यास गर्दीवर नियंत्रण करणे सुरक्षित होईल. त्यामुळे पश्चिम द्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी भाविकांसाठी बाहेर पडण्याचा एकेरी रहदारीसाठी होणे सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्वाचे आहे.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष एस कार्तिकेयन यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ३४ (क) अन्वये, सदर आदेश पारीत केला आहे.या आदेशाचे उल्लंघन झाल्यास उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ नुसार कारवाईस पात्र राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

शेवटच्या क्षणी संजीव पाटलांची माघार; आमदार सचिन कल्याणशेट्टी बिनविरोध डीसीसीवर

अक्कलकोट तालुक्यातील काँग्रेस व शिवसेनेच्या नेत्यांनाही धक्का

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्याचे लक्ष लागलेल्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सोसायटी मतदारसंघातून आम दार सचिन कल्याणशेट्टी हे बिनविरोध निवडून आल्याची माहिती मिळाली आहे. सचिन कल्याण शेट्टी यांच्या विरोधात अर्ज दाखल केलेले संजीव पाटील यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला त्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील काँग्रेस आणि शिवसेनेच्या नेत्यांनाही काहीसा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

अक्कलकोट सोसायटी म तदारसंघातून या निवडणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी, विश्वेश्वर नागुर तसेच संजीव सिद्राम पाटील या ठिकाणी अर्ज दाखल केले होते त्यामध्ये नागूर यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. संजीव पाटील हे उमेदवारी अर्ज मागे घेणार का नाही याबाबत चर्चा सुरू होत्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी बरोबर तीन वाजता संजीव पाटील हे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांच्यासोबत निवडणूक कार्यालयात आले होते. ते बराच वेळ या ठिकाणी थांबून होते. त्यावेळी माहिती घेतली असता समजले की संजीव पाटील हे माघार घेणार नाहीत परंतु पाटलांनी अचानक माघार घेऊन सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील या दोघांसोबत संजीव पाटील यांनी येऊन आपला अक्कलकोट साठी उमेदवारी अर्ज भरला होता.

मात्र अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश सोसायटी या आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्याकडे आल्याने पाटलांना यंदाच्या निवडणुकीत चांगलीच अडचण झाल्याचे दिसून आले.

दरम्यान यापूर्वी अक्कलकोट तालुक्यातून माजी आमदार सिद्धामप्पा पाटील, माजी मंत्री सिद्ध-राम म्हेत्रे जिल्हा मध्यवर्ती बँकेवर संचालक झाले होते आणि आता आमदार सचिन कल्याणशेट्टी हे संचालक म्हणून गेले आहेत.



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांची बिनविरोध निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महत्त्वाची राजकीय घडामोडी घडली असून मा.आ. प्रशांत परिचारक यांची बिनविरोध निवड झाली आहे. स्वतः सम ीकरणाच्या दृष्टीने या निवडीला महत्त्व प्राप्त झाले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत तू कधीपासून अनेक दिग्गज नेत्यांनी आपली नशीब आजम ावले होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून ते छाननी ती अपील करण्यापर्यंत निवडणूक काही चर्चे तच होती व काही प्रमुख नेत्यांचे अर्ज बास झाली तर काही राजकीय



परिस्थितीतून माघार घेतली त्यामुळे निवडणुकीतील समीकरणे सातत्याने बदलत राहिली,

या पार्श्वभूमीवर प्रशांत परिचारक यांची बिनविरोध निवड महत्त्वा-ची मानली जात आहे. पंढरपूर तालुक्याचे राजकारणात प्रभाव असलेली परिचारक यांचे सहकार क्षेत्रातील स्थानी अतिशय महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीचे जिल्हा बँकेचे आगामी राजकीय घडामोडींना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर गेल्या अनेक वर्षापासून प्रशासकीय कारभार होता. आता निवडणुकीच्या म ाध्यमातून नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येत आहे त्यामुळे दिशा नेतृत्व आणि अध्यक्षपदी निवड याकडे सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

डीसीसी बँक निवडणूक : अखेर बापूंनी घेतली माघार! सुभाष देशमुखांचा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर जिल्हा म ध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अखेर माजी सहकारमंत्री तथा आमदार सुभाष बापू देशमुख यांनी माघार घेतली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी सुरुवातीला उमेदवारी अर्ज दाखल करून रिंगणात उतरलेल्या बापूंनी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत उतरणाऱ्या बड्या राजकीय नेत्यांपैकी आणखी एका नेत्याची माघार झाली आहे.

सोलापूरच्या राजकारणात सुभाष बापू देशमुख हे भाजपचे ज्येष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. राज्याचे



सहकारमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत त्यांनी उमेदवारी दाखल केल्यापासून त्यांच्या भूमिकेकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लाग-ले होते. २९ ऑक्टोबर रोजी त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

जिल्हा बँकेची निवडणूक ही केवळ संचालक निवडीपुरती मर्यादित नसून जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावरील राजकीय प्रभावाच्या दृष्टीनेही महत्त्वा-ची मानली जाते. बँकेच्या १९ संचालक पदांसाठी ही निवडणूक होत असून जिल्ह्यातील आजी-म ाजी आमदारांसह अनेक दिग्गज नेते या निवडणुकीत उतरले होते.

अशा परिस्थितीत सुभाष देशमुख यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने माघार घेणे ही या निवडणुकीतील महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

विशेष म्हणजे, अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी आमदार समाधान आवताडे आणि आमदार अभिजित पाटील यांनीही माघार घेतली. त्यामुळे तीन आमदारांनी या निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याचे चित्र समोर आले आहे.

दरम्यान, सुभाष बापूंनी माघार घेण्यामागे नेमके कोणते राजकीय गणित आहे, याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. मात्र त्यांच्या या निर्णयामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

आता सुभाष देशमुख यांच्या म ाघारीनंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत उर्वरित उमेदवारांमध्ये कोणत्या प्रकारची लढत रंगणार आणि पुढील काळात बापूंची सहकार क्षेत्रातील भूमिका काय राहणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

भाजपच्या सहकार विकास पॅनल विरोधात मोहिते पाटलांचे स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर जिल्हा म ध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक अखेर लागली असून आता ही निवडणूक थेट भारतीय जनता पार्टी विरुद्ध मोहिते पाटील असे होणार आहे.

बँकेच्या १९ संचालकापैकी सोसायटी मतदार संघातील नऊ आणि इतर मागास प्रवर्ग एक अशा दहा जागा बिनविरोध झाल्या असून त्या भाजप पुरस्कृत सहकार विकास पॅनलच्या आहेत उर्वरित नऊ जागेसाठी ही निवडणूक होत असून भाजप समविचारी सहकार विकास पॅनल विरोधात आता मोहिते पाटील







यांनी आपले स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनल उभे केले आहे.

स्वाभिमानी सहकार पॅनल मध्ये माळशिरस विकास सोसायटीतून अर्जुनसिंह मोहिते पाटील, म हिला प्रतिनिधी मध्ये सिंधू सुरेश पाटील, अस्मिता सुरेश गायकवाड, अनुसूचित जाती जमाती दत्त-ात्रय खडतरे, भटक्या व विमुक्त जाती अनिकेत चंद्रकांत देशमुख, कृषी व पणन संग्रामसिंह जहा-गीरदार, शिवाजी बलभीम पाटील दुग्ध संस्था, अमोल बाळासाहेब शिंदे नागरी बँका या उमेदवारांचा सहभाग आहे.

दुसरीकडे भाजप प्रणित सहकार विकास पॅनल मध्ये सांगोला विकास सोसायटी आमदार बाबासाहेब देशमुख, माळशिरस विकास सोसायटी शहाजीराजे देशमुख, नागरी बँका मनीष देशम ुख, महिलांमधून शामल दिगंबरराव बागल अर्चना दिलीप घाडगे, अनुसूचित जाती जमाती मधून महादेव किसन कांबळे, विमुक्त जाती भटक्या जमाती राजेंद्र धूळप्पा बंदीछोडे, कृषी पणन रणजितसिंह बबनराव शिंदे, दुग्ध संस्था सूर्यादित्य दिपक साळुंखे हे उमेदवार रिंगणात आहेत.

चिन्हाचे वाटप बुधवार सकाळी ११ वाजता होणार आहे.

तब्बल २८ वर्षांनंतर वर्गमित्र आले एकत्र; जुन्या आठवणींना मिळाला उजाळा!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर/प्रतिनिधि : शालेय जीवनातील मैत्रीचे नाते काळाच्या ओघात कधीच धूसर होत नाही, याचा प्रत्यय सरस्वती विद्यालय, रामेश्वर येथील माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यातून आला. तब्बल २८ वर्षांनंतर, १९९८ च्या १० वी च्या एकाच वर्गात शिक्षण घेतलेले वर्गमित्र एकत्र आले, आणि जुन्या आठवणींना उजाळा देत बालपणीच्या रम्य दिवसांत पुन्हा एकदा रममाण झाले.

सरस्वती विद्यालय रामेश्वरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा लातूर येथे उत्साहात; गुरुजनांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान.

लातूर येथे आयोजित या स्नेहम ेळाव्यात अ न े क वर्षांनंतर भेटलेल्या मित्र-मैत्रिणींनी एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. शाळेतील गमतीजमती, वर्गातील धमाल, शिक्षकांनी केलेले संस्कार, खेळाचे दिवस, सहली आणि मित्रांसोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण यांना उजाळा देण्यात आला. काळाच्या ओघात प्रत्येक जण आपापल्या व्यवसायात, नोकरीत आणि संसारात रमला असला, तरी मैत्रीचा धागा मात्र कायम असल्याचे या निमित्ताने दिसून आले.

या स्नेहमेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी आयुष्यभर ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या सखाराम लाड, केंद्रे संजय, सोनवणे विष्णू, जाधव गोविंद, कुलकर्णी प्रदीप, मुंढे सुग्रीव, शेप बालासाहेब, चिलवंत महादेव, तानाजी पांचाळ या गुरुजनांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला.

गुरुजनांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाम ुळेच जीवनात योग्य दिशा मि ळाल्याची भावना व्यक्त केली.

२८ वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेतील मित्रपरिवार एकत्र आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. हा मेळावा केवळ भेटीगाठींचा कार्यक्रम न ठरता मैत्री, प्रेम, आपुलकी आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा अविस्म रणीय सोहळा ठरला. जुन्या आठवणींची शिदोरी घेऊन आणि पुन्हा भेटण्याचा संकल्प करून या स्नेहमेळाव्याची सांगता झाली.

आपत्कालीन सेवांसाठी रस्ते केले मोकळे; अनधिकृत अतिक्रमण केल्यास कठोर कारवाईचा इशारा

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात सलग तीन दिवस अतिक्रमण हटाव मोहीम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी वारी महायात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांची सुरक्षितता आणि गर्दीचे नियोजन लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शहरात सलग तीन दिवस विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. पंढरपूर नगरपरिषद, जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली. असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

रविवार, दि. १५ नोव्हेंबर ते मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर या कालावधीत शहरातील प्रमुख रस्ते, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आणि चंद्रभागा वाळवंट परिसरातील



अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली.

पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेशन रोड, चौफाळा ते म हाद्वार घाट, अहिल्यादेवी चौक ते गजानन महाराज मंदिर तसेच चंद्रभागा वाळवंट परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली.

यामध्ये अनधिकृत टपऱ्या आणि उसाच्या दुकानांचाही समावेश होता. संबंधित व्यावसायिकांना सार्वजनिक जागेवर पुन्हा अतिक्रमण न करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी स्टेशन रोड, छत्रपती शिव-ाजी महाराज चौक ते चौफाळा रोड आणि गांधी रोड ते प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. चौफाळा ते मंदिर परिसरातील दुकानदारांना दुकाने व विक्रीचे साहित्य पांढऱ्या पट्टीच्या आत ठेवण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या.

तिसऱ्या दिवशी चौफाळा ते मंदिर परिसरातील पांढऱ्या पट्टीबाहेरील अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच प्रदक्षिणा मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अर्बन बँक आणि गजानन महाराज मठ ते भक्ती मार्ग या परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यात आली.

या संयुक्त मोहिमेसाठी तीन दिवसांत पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. पहिल्या दिवशी २ पोलीस अधिकारी व ४ कर्मचारी, दुसऱ्या दिवशी ३ पोलीस अधिकारी, ८ कर्मचारी व ५ होमगार्ड, तर तिसऱ्या दिवशी २ पोलीस अधिकारी, ९ कर्मचारी व १० होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कार्तिकी वारीदरम्यान वारकऱ्यांना रुग्णवाहिका, अग्निशामक दल यांसारख्या आपत्कालीन सेवा विनाव्यत्यय उपलब्ध व्हाव्यात, तसेच गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना टाळता यावी, यासाठी रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आवश्यक आहे. या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, नगरपरिषदेचे अधिकारी व २० कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

शहरात यापुढे अनधिकृत अतिक्रमण केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील लागू तरतुद-ींनुसार कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.